<u>सार्वत्रिक बदल्या सन २०१९-२०</u>
अधीक्षक,गट-अ,
राज्य उत्पादन शुल्क.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन आदेश क्रमांक:- इएसटी-१२१९/प्र.क्र.३४ /राउशु-१,
मंत्रालय, मुंबई-४०० ३२.
दिनांक:- ३१ मे, २०१९.

शासन आदेश-

अधीक्षक, गट-अ, राज्य उत्पादन शुल्क या संवर्गातील **स्तंभ (२)** मधील नमूद अधिकाऱ्यांची, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील नियम ४ (४) मधील तरतुदीनुसार, प्रशासकीय बदल्या करण्यात येत असून त्यांची पदस्थापना खालील **स्तंभ (४)** मध्ये दर्शविलेल्या पदावर करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	सध्याचे पद	नवीन पदस्थापना
१	**२**	**३**	**४**
१	श्री. सुधीर आढाव	अधीक्षक, जळगांव	----
२	श्री. अनिल चासकर	अधीक्षक, मुंबई शहर	अधीक्षक, सातारा
३	श्री. सुधाकर कदम	अधीक्षक, बुलढाणा	अधीक्षक, औरंगाबाद

२. **अ.क्र. १** येथील श्री.आढाव हे लगतच्या वर्षात नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणार असल्याने अधीक्षक, जळगांव या पदावर त्यांना सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. **अ.क्र.२** येथील श्री.चासकर यांच्या नवीन पदस्थापनेचे पद रिक्त होईपर्यंत त्यांना सद्याच्या पदावरुन कार्यमुक्त करण्यात येऊ नये. **अ.क्र. ३** येथील अधिकाऱ्यास तात्काळ नवीन पद स्थापनेच्या ठिकाणी रुजू होणेसाठी कार्यमुक्त करण्यात यावे. बदली आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व्हावी.

३. बदली झालेले अधिकारी त्यांच्या सध्याच्या पदावरून कार्यमुक्त होऊन रूजू होण्यासाठी आल्यानंतर त्यांना विनाविलंब रूजू करून घ्यावे. सदर अधिकाऱ्याला रूजू करून न घेतल्यामुळे काम न देता सक्तीचा प्रतिक्षाकाळ ठरवून वेतन व भत्ते देण्याचा प्रसंग उद्भवल्यास संबंधीत अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल. संबंधित अधिकाऱ्यांना नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत शासनास त्वरीत कळवावे.

४. बदलीच्या आदेशात बदल करून घेण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्याने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे ती गैरवर्तणूक समजून संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०५३११५१९५१२६२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sudhakar Shahaji Yadav

Digitally signed by Sudhakar Shahaji Yadav
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3e782c1e59acd749fc48c691d7a8c477d6ac39c1904204f442b52d728d48a67a, cn=Sudhakar Shahaji Yadav
Date: 2019.05.31 19:10:55 +05'30'

(सुधाकर श. यादव)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत

१) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा. मंत्री (राउशु) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव, राज्य उत्पादन शुल्क यांचे स्वीय सहायक.
४) महालेखापाल-१ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६) संबंधित अधिकारी (मार्फत आयुक्त, राउशु, महाराष्ट्र राज्य, मुंबई.)
७) कार्यसन अधिकारी राउशु-२ व राउशु-३.
८) निवडनस्ती (राउशु-१).